जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 5 JAN 2017
लोकमत

# राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रसार गरजेचा : नांदवडेकर

वडणगे : राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून वेगवेगळ्या शिबिरांचे आयोजन करून सर्वसामान्य नागरिकांच्या अनेक समस्या सोडविण्यासाठी हातभार लागतो. याकरिता राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रचार होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

पाडळी बुद्रुक (ता. करवीर) येथे महावीर महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे होते. यावेळी माजी सभापती पी. डी. पाटील, सरपंच संभाजी कांबळे, डॉ. डी. के. गायकवाड उपसरपंच लाडूबाई पाटील, प्रा. अंकुश बनसोडे, उपस्थित होते.

- 5 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# संविधानिक मूल्यांच्या आधारे लोकशाहीचे जतन आवश्यक

## हरिष भालेराव : सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यान

कोल्हापूर : संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता, मानवता, परस्परांतील जिव्हाळा आणि नैतिकतेची देणगी भारतीयांना दिलेली आहे. या तत्त्वांच्या आधारे भारतीय लोकशाहीचे आपण जतन केले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांनी मंगळवारी येथे केले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे होते. डॉ. भालेराव म्हणाले, भारतीय संविधान आणि समान संधी हा मानवतेवर आधारित विचार आहे. समान संधीच्या अनुषंगाने केंद्र-राज्य संबंध, जात, धर्म, वर्ग, पंथाच्या आधारे कोणताही विचार केला जात नाही. देशात कायद्याचे राज्य आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी सर्वांना समान संधी असली पाहिजे. संविधानाच्या कलम १४, कलम १६ आणि मार्गदर्शक तत्त्वांतील ४६व्या कलमानुसार संविधानाने समान संधी देण्याचा प्रयत्न केला आहे.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून डॉ. भगवान माने, बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, प्रतिभा पाटणकर उपस्थित होत्या.

कार्यक्रमात एम.एड्.च्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी पल्लवी जोशी यांनी 'मी सावित्रीबाई फुले बोलते' हा एकपात्री प्रयोग सादर केला. समान संधी कक्ष समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी कक्षाविषयी माहिती दिली. याप्रसंगी आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. जगन कराडे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विकास केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने यांनी प्रास्ताविक केले. अविनाश वर्धन यांनी सूत्रसंचालन केले. विधी विभागाचे प्रभारी विभागप्रमुख व्ही. वाय. धुपदाळे यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 JAN 2017

पुढारी



कोल्हापूर : सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ. हरिष भालेराव. डॉ. भगवान माने, डॉ. डी. आर. मोरे, डॉ. प्रतिभा पाटणकर. (छाया : तय्यब अली)

# संविधान मूल्यांद्वारे लोकशाहीचे जतन आवश्यक : डॉ. भालेराव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता, मानवता, परस्परातील जिव्हाळा व नैतिकतेची देणगी भारतीयांना दिली आहे. या तत्त्वांच्या आधारे भारतीय लोकशाहीचे जतन केले पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांनी केले.

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रामध्ये आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. भालेराव म्हणाले, भारतीय संविधान आणि समान संधी हा मानवतेवर आधारित विचार आहे. समान संधीच्या अनुषंगाने केंद्र-राज्य संबंध, जात, धर्म, वर्ग, पंथाच्या आधारे कोणताही विचार केला जात नाही. देशात कायद्याचे राज्य आणि न्याय प्रस्थापित करण्यासाठी सर्वांना समान संधी असली पाहिजे. संविधानाच्या कलम १४, कलम १६ आणि मार्गदर्शक तत्त्वांतील ४६ व्या कलमानुसार संविधानाने समान संधी देण्याचा प्रयत्न केला आहे.

पल्लवी जोशी यांनी 'मी सावित्रीबाई फुले बोलते' हा एकपात्री प्रयोग सादर केला. समान संधी कक्ष समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी कक्षाविषयी माहिती दिली. डॉ. भगवान माने यांनी प्रास्ताविक केले. अविनाश वर्धन यांनी सूत्रसंचालन केले. व्ही. वाय. धुपदाळे यांनी आभार मानले.

5 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# क्रांतिज्योती सावित्रीबाईंना अभिवादन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १८६वी जयंती शिवाजी विद्यापीठात विविध उपक्रमांसह साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बीसीयुडी संचालक डॉ. डी. आर. मोरे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, समाजशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ.जगन कराडे, इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. पद्मजा पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने, डॉ. नंदा पारेकर, डॉ. ए. एम. गुरव आदी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ व प्रतिबंध' या विषयावर शारीरबोध संस्थेच्या अध्यक्षा राजश्री साकळे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. पद्मजा पाटील होत्या. अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. एन. डी. पारेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. पी. देसाई यांनी परिचय व स्वागत केले. अविनाश भाले यांनी आभार मानले.

### लोकशाहीचे जतन आवश्यक : डॉ. हरीश भालेराव

'भारतीय संविधानाने न्याय, स्वातंत्र्य, समता, मानवता, परस्परांतील जिव्हाळा आणि नैतिकतेची देणगी भारतीयांना दिलेली आहे. या तत्वांच्या आधारे भारतीय लोकशाहीचे आपण जतन केले पाहिजे', असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी बीसीयुडी संचालक डॉ. डी.आर. मोरे होते. एम.एड.ची प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी पल्लवी जोशी यांनी 'मी सावित्रीबाई फुले बोलते' हा एकपात्री प्रयोग सादर केला. समान संधी कक्ष समन्वयक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांनी कक्षाविषयी माहिती दिली. याप्रसंगी आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. जगन कराडे यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर केंद्राचे संचालक डॉ. भगवान माने यांनी प्रास्ताविक केले. विधी विभागाचे प्रभारी विभागप्रमुख व्ही. वाय. धुपदाळे यांनी आभार मानले. अविनाश वर्धन यांनी सूत्रसंचालन केले.



### मानव्यविद्या अधिविभागांतर्फे अभिवादन

यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, शारदाबाई पवार अध्यासन, नेहरू अभ्यास केंद्र, गांधी अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने एम.ए.-भाग २ (राज्यशास्त्र)मधील रूचिरा सनदी या दिव्यांग मुलीच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. या वेळी डॉ. भारती पाटील, डॉ. वासंती रासम, प्रा. कविता वड्राळे, प्रा. व्ही.पी.भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. रविंद्र भणगे, डॉ.एन. सी. माळी, डॉ.एस.एस. सुतार, प्रा. जे.जे. साळुंखे, डॉ.रामदास बोलके, मृणाली जगताप उपस्थित होते.

### शिक्षणशास्त्र अधिविभागात कार्यक्रम

शिक्षणशास्त्र अधिविभागात अधिविभागप्रमुख डॉ. पी.एस. पाटणकर यांनी सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी 'शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन स्पर्धा २०१६ 'मध्ये यश प्राप्त करणारे संशोधक विद्यार्थी नगिना माळी व एम.एड. प्रशिक्षणार्थी विजय मुलाळे यांचा सत्कार करण्यात आला.

### महापालिकेत अभिवादन

कोल्हापूर : महापालिकेच्यावतीने क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. महापौर हसीना फरास यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले. उपमहापौर अर्जुन माने, महिला व बालकल्याण समिती सभापती वृषाली कदम, नगरसेवक सचिन पाटील, अशोक जाधव, आरोग्य अधिकारी डॉ. अरुण वाडेकर, सावित्रीबाई फुले हॉस्पिटलचे प्रशासनाधिकारी डॉ. प्रकाश पावरा उपस्थित होते.

### जय भारत हायस्कूल

रुईकर कॉलनी येथील जयभारत शिक्षण संस्थेच्या जयभारत हायस्कूलमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन ॲड. महेश खांडेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी आर्श शिक्षिका पुरस्कारप्रप्त सुमित्रा जाधव यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जाधव यांचे 'स्त्री शिक्षणात सावित्रीबाईंचे योगदान' या विषयावर मनोगत व्यक्त केले. ॲड. खांडेकर यांच्या हस्ते शाळेतील इ लर्निंगचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विद्यारि्थनींनी कराटेची प्रात्यक्षिके दाखविली. तसेच रांगोळी, मेहंदी, वेशभूषा स्पर्धांचे आयोजनही करण्यात आले. यावेळी एकनाथ कुंभार, मीरा गोसावी, पूनम खांडेकर, सोनल चव्हाण, सुनंदा साळोखे, मंदाकिनी पाटील, अश्विनी पाटील, मुख्याध्यापक अभर भोसले, संयज पाटील उपस्थित होते. सिमरन जमादार हिने सूत्रसंचालन केले तर उज्ज्वला बुणांद्रे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

5 JAN 2017

पुण्यनगरी

# व्यक्तिमत्त्व विकासाने विद्यार्थी यशस्वी

## – विशाल लोंढे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधणारे विद्यार्थीच यशोशिखर गाठू शकतात. ज्ञान मिळविणे म्हणजे मनुष्य जीवन सुफल करणे होय. अभ्यास सगळेच परीक्षार्थी करतात; परंतु खरे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न खूप कमी विद्यार्थी करतात, असे मत समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना विशाल लोंढे.**

शिवाजी विद्यापीठाच्या सेवा पूर्व मार्गदर्शन केंद्राच्या वतीने विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावरील विशेष व्याख्यानात विशाल लोंढे बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

लोंढे म्हणाले, महिला सर्वच क्षेत्रांत अग्रेसरपणे कार्यरत आहेत. आपल्या कार्यप्रणालीमध्ये आमूलाग्र बदल घडविण्यासाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा आदर्श घेतला पाहिजे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होऊन सामाजिक जीवनात वावरताना विद्यार्थ्यांनी आपला प्रत्येक क्षण, आपली ऊर्जा समाजाच्या उन्नतीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. समाजाबद्दल आपुलकी आणि आस्थ बाळणारेच पुढे यशस्वी होतात. स्वतःला फसविता सजगतेने अभ्यास केल्यास निश्चि यश मिळते.

कुलसचिव नांदवडेकर म्हणाले, स्पर्ध परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी जागति चालू घडामोडींचा अत्यंत काळजीपूर्व अभ्यास करणे आवश्यक आहे. आज सुज्ञ विद्यार्थीच उद्याचा चांगला समा निर्माण करू शकतो. जगन कराडे यां स्वागत व प्रास्ताविक केले. सचिन कद यांनी परिचय करून दिला. अमित कांब यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

-5 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# स्वत:ची अभ्यासपद्धती तयार करा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



विशाल लोंढे

'व्यक्तिमत्त्वाचा विकास साधणारे विद्यार्थीच यशोशिखर गाठू शकतात. ज्ञान मिळविणे म्हणजे मनुष्य जीवन सुफल करणे होय. परीक्षेच्या कालावधीत सर्व विद्यार्थी अभ्यास करतात. मात्र, खरे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न खूप कमी विद्यार्थी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांनी स्वत:ची अभ्यासाची पद्धत तयार करावी,' असे मत समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सेवापूर्व मार्गदर्शन केंद्राच्यावतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमात बोलताना लोंढे म्हणाले, 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना विषयांचे सखोल ज्ञान घेणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी विविध स्पर्धा परीक्षा केंद्रांचे मार्गदर्शन घेण्यापेक्षा स्वत:ची एक विशिष्ट अभ्यास पद्धती निर्माण करून यश प्राप्त करणे शक्य आहे. विद्यार्थ्यांनी मनात ऊर्मी बाळगून ध्येयप्राप्तीसाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजे. उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य वापर करून जिद्द व चिकाटीने अभ्यास करावा. सजगतेने घेतलेला निर्णय व जलद कृतिशीलता विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी बनवते. आपल्या कार्यप्रणालीत आमुलाग्र बदल घडविण्यासाठी सावित्रीबाई फुलेंचा आदर्श घेतला पाहिजे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अधिकारी होऊन सामाजिक जीवनात वावरताना विद्यार्थ्यांनी आपला प्रत्येक क्षण, आपली ऊर्जा समाजाच्या उन्नतीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. समाजाबद्दल आपुलकी आणि आस्था असणारे पुढे यशस्वी होतात.'

कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'स्पर्धा परीक्षेला सामोरे जाताना विद्यार्थ्यांनी जागतिक चालू घडामोडींचा अभ्यास करणे आवश्यक आहे. आजचा सुज्ञ विद्यार्थीच उद्याचा चांगला समाज घडवू शकतो.' सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ. जगन कराडे यांनी प्रास्ताविक केले. अमित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. सचिन कदम यांनी आभार मानले.

-5 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकसत्ता

# विश्वकोश मंडळ -शिवाजी विद्यापीठ सामंजस्य करार

## मराठी साहित्य, इतिहास, राज्यशास्त्र विषयांवर ज्ञानमंडळे

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

**जगातील विविध** विषयातील ज्ञान विश्वकोशाच्या साहाय्याने मराठीत आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या दरम्यान विद्यापीठात सामंजस्य करार करण्यात आला. या करारान्वये मराठी विश्वकोशाच्या अद्ययावतीकरणासाठी शिवाजी विद्यापीठात आधुनिक इतिहास, राज्यशास्त्र आणि मराठी साहित्य या तीन विषयांची ज्ञानमंडळे स्थापन केली जाणार आहेत.

जागतिक स्तरावरील विविध ज्ञानशाखांमधील ज्ञान मराठी भाषेत आणण्यामध्ये मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाची महत्त्वाची भूमिका आहे. आता नवतंत्रज्ञान आणि ज्ञानाची वाढत असलेली व्याप्ती आणि होत असलेला विस्तार लक्षात घेता विद्यापीठांमधील तज्ज्ञांना त्यामध्ये सामावून घेण्याचा मंडळाचा हेतू आहे. यामुळे मराठीमधील ज्ञानविस्तार वाढण्याबरोबरच त्यामध्ये आंतरक्रियात्मकतेला संधी असल्याने संवाद वाढणार आहे. तद्वत, लोकसहभाग वाढणार आहे . समाजाच्या सर्व स्तरांतील घटकांचे ज्ञानाच्या आदानप्रदानामध्ये समावेशन होण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**प्रकल्पाचे स्वरुप**

'मराठी विश्वकोश अद्ययावतीकरण' या प्रकल्पांतर्गत विश्वकोश निर्मिती मंडळाने विविध विद्यापीठांना ज्ञानमंडळांद्वारे सहभागी करून घेण्याकरिता सामंजस्य करार करण्याचा निर्णय घेतला. मंडळाने निर्मिलेल्या २० विश्वकोश खंडांमधील नोंदींचे अद्ययावतीकरण करणे, विविध विषयांवरील नव्या माहितीची सातत्याने भर टाकणे यासाठी ज्ञानमंडळांची स्थापना केली आहे. प्रत्येक उपविषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ स्थापन करून ही सर्व ज्ञानमंडळे एकमेकांशी जोडणे व त्या आधारावर विश्वकोशाची पुढील रचना करणे, हा उद्देश आहे.

मराठी विश्वकोश खंड १ ते २० मधील नोंदींच्या अद्ययावतीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कालबाह्य झालेल्या नोंदी निश्चित करणे, विद्यमान नोंदींचे पुनर्लेखन करणे, नव्या नोंदी लिहून घेणे आदी विविध विषयांचा यात समावेश आहे. हे प्राथमिक काम पूर्ण झाल्यानंतर जगात प्रकाशित होणाऱ्या माहितीच्या साहाय्याने नोंदी अद्ययावत करण्याची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवणे याही कामाचा अंतर्भाव असेल. यासाठी ज्ञानमंडळाची स्थापना करण्यात येत आहे. प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र ज्ञानमंडळ असेल आणि ही सर्व ज्ञानमंडळे विश्वकोशाशी जोडली जातील. या योजनेअंतर्गत शिवाजी विद्यापीठाने आधुनिक इतिहास, राज्यशास्त्र आणि मराठी साहित्य या विषयांची पालकसंस्था म्हणून ज्ञानमंडळाची जबाबदारी घेण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे.

विद्यापीठांमध्ये ज्ञानमंडळांची स्थापना करून त्यांच्या माध्यमातून ज्ञानवर्धन करण्याचा महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचा उपक्रम अत्यंत समाजोपयोगी आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी या वेळी व्यक्त केले. मंडळाचे प्रमुख अध्यक्ष तथा संपादक दिलीप करंबेळकर प्रमुख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

5 JAN 2017

लोकमत

# निर्भय होऊन जाब विचारावा

## राजश्री साकळे : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यान

**कोल्हापूर :** पुरुषसत्ताक विचारसरणी आणि संस्कार प्रामुख्याने अत्याचारांना कारणीभूत असतात. स्त्रियांनी निर्भय होऊन अशा प्रवृत्तींना जाब विचारला पाहिजे, असे प्रतिपादन शारीरबोध संस्थेच्या अध्यक्षा राजश्री साकळे यांनी मंगळवारी येथे केले.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात आयोजित केलेल्या व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी डॉ. पद्मजा पाटील होत्या. विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र व इतिहास अधिविभागातर्फे आयोजित या व्याख्यानाचा विषय 'कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ व प्रतिबंध' असा होता.

अध्यक्षा साकळे म्हणाल्या, लैंगिक छळ हा भांडवली व्यवस्थेचा भाग आहे, जिथे महिलांकडे उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जाते.




शिवाजी विद्यापीठात मंगळवारी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात शारीरबोध संस्थेच्या अध्यक्षा राजश्री साकळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून डॉ. पद्मजा पाटील, डॉ. एन. डी. पारेकर उपस्थित होत्या.

कायद्याची अंमलबजावणी करताना महिलांच्या अधिकारांचे आपण संरक्षण व संवर्धन करतो.

पुरुषसत्ताक विचारसरणी आणि संस्कार प्रामुख्याने अशा अत्याचारांना कारणीभूत असतात. स्त्रियांनी निर्भय होऊन अशा प्रवृत्तींना जाब विचारला पाहिजे. कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी जनजागृतीची गरज आहे. कार्यक्रमात अभ्यास केंद्राच्या समन्वयक डॉ. एन. डी. पारेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. पी. देसाई यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

5 JAN 2017

Times of India

SUK Seeks For Annual Reports; Extends Secure Remote Paper Delivery System

# Varsity instructs colleges to submit NAAC reports

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has instructed its affiliated colleges to submit their National Assessment and Accreditation Council (NAAC) reports at the earliest. According to the SUK circular, the data will be forwarded to the Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA).

Director, higher education, Dhanraj Mane in a letter on December 31 said, "The university officials have to submit the annual report giving basic information for NAAC assessment. If the colleges have not conducted NAAC assessments, they will have to specify reasons for that."

While the state project joint director, Sharad Patil on December 30 said, "In order to give impetus to the accreditation process in the public universities in the state as well as colleges affiliated to them, an action plan needs to be prepared. This will ensure that most of these institutions go for the accreditation cycle before the end of March 2017."

**Colleges who will not be submitting their NAAC reports will have to state valid reasons for not conducting NAAC assessments**

According to Patil, with this aim, a joint meeting of the regional joint directors and directors of the board of colleges and university development (BCUD) of the public universities in scheduled on January 7.

A SUK official said, "Currently, every educational institution needs to evaluate itself through NAACs five yearly re-accreditation procedure to keep itself updated in terms of the academic and administrative performance."

Another SUK official said, "Accreditation is a mandatory norm and if not applied, these institutions might as well lose any kind of benefits that the central or state government may offer. There are various funding through the University Grants Commission (UGC) and Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA)."

# More courses to come under SRPD system

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The vice chancellor of Shivaji University, Kolhapur (SUK), Devanand Shinde has given a green signal to the examination department of SUK to extend the use of their Secured Remote Paper Delivery (SRPD) system.

SUK had released a circular last week when the controller of examination (COE) Mahesh Kakade said, " Few additional courses have been added to the existing list of SRPD. We have recieved excellent response and we will be adding new courses from the next semester."

Kakade in the circular added, "Along with the existing courses of engineering, law, pharmacy and management, we have added MSc, MCA, and BCom among others in the SRPD. Due to the efforts from each and every staff member, the SRPD system was successful this year. We are planning to add the remaining courses in SRPD in the future too. I hope that this system will help the same this year."

According to a SUK official, the SRPD system has proven best in the confidentiality matter. However, in exceptional events like electricity failure, unavailability of internet, and technical difficulty in the computer system in the host colleges can cause delay in the delivery of examination question paper. In such events the university had strictly instructed to provide additional timing for the time lost.

The official said, "Under SRPD, the examination department can send the concerned papers directly to the concerned examination centres in an encrypted format through online mode. Nobody can decrypt the online copy of the paper. At the examination centre too, the concerned authority are given two one-time passwords, one to decrypt the document and other one to download the copy."

The official added, "The examination department had implemented the system for engineering in October 2012 on an experimental level, which was successful, and was further extended to the Pharmacy in March 2013."

# Kanbarkar award nominations last date January 20

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited nominations for the principal R K Kanbarkar award. The last date for nominations are January 20.

A circular was released on January 2 that said that nominations can only be done by a person not below the rank of vice-chancellor and equivalent.

The circular said, "An academician worthy of that position , who has done outstanding contributions in the field of education, literature, social work and cultural activities will be consdired worthy for the award. The award shall be given without any consideration of religion, region, caste, creed language and gender."

The award will be conferred on April 13 which is the birth anniversary of R K Kanbarkar, with a cash prize of Rs 1.51 lakh, memento and a shawl to the awardee.

A SUK official said, " The university had appointed a five-member search committe for the fair selection of the desired candidate. The committee shall be headed by the vice-chancellor himself."

The award, which started from last year, is conferred on an annual basis for which the Kanbarkar family has handed over a cheque of Rs 25 lakh to the university in the year 2015.

A special permission has been granted by the management council members for the award.

Last year, eminent scientist, Bharat Ratna C N R Rao conferred the Kanbarkar award to the best nominated prinicipal.

Kanbarkar, an octogenarian social activist, was vice chancellor of Shivaji University, Kolhapur from 1980 to 1983. He was the frontline leader of several progressive movements in the city.

He was also executive member of several social and educational organizations in the city. He had an active role in the creation of the university act, in the year 1974.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

5 JAN 2017

पुण्यनगरी

# सावित्रीबाईंना अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, शारदाबाई पवार अध्यासन, नेहरू अभ्यास केंद्र, गांधी अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. एम.ए.-भाग २ (राज्यशास्त्र) मधील रुचिरा सनदी या दिव्यांग मुलीच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.